“ हिंगोली जिल्ह्यातील हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

विठ्ठल दत्तराव कदम

सामाजिक शास्त्रे विद्यासंकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.

मार्गदर्शक

डॉ.डी.के. मगर

पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागप्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर जि. नांदेड.

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे विद्यासंकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

डिसेंबर : 2022

“ हिंगोली जिल्ह्यातील हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास ”

प्रस्तावना :

अर्थव्यवस्था म्हणजे अशी व्यवस्था किंवा प्रणाली असते की, ज्यामध्ये एका ठराविक भौगोलिक क्षेत्रातील विविध अभिकर्त्यांमार्फत वस्तु व सेवांचे उत्पादन, वितरण, व्यापार आणि उपभोग केला जातो त्याला अर्थव्यवस्था असे म्हणतात. उत्पादन , उत्पन्न, वितरण आणि उपभोग या आर्थिक घटकांच्या क्रिया आणि प्रक्रिया होतात. त्या क्रिया प्रक्रिया विषयी जी व्यवस्था किंवा प्रणाली असते तीला अर्थव्यवस्था म्हणतात. अर्थ व्यवस्थेचे उत्पादन व्यवस्था व राजकीय व्यवस्थेनुसार प्रकार पडतात त्यामध्ये उत्पादन व्यवस्थेमध्ये अल्पविकसीत अर्थव्यवस्था, विकसित अर्थव्यवस्था आणि विकसनशिल अर्थव्यवस्था तर राजकीय व्यवस्थेनुसार भांडवलशाही अर्थ व्यवस्था साम्यवादी अर्थव्यवस्था, समाजवादी अर्थ व्यवस्था आणि मिश्र अर्थ व्यवस्था असे प्रकार पडतात.

भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील एक महत्वाची अर्थव्यवस्था आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही विकसनशील आणि मिश्र अर्थव्यवस्था आहे. भारतात संघीय पद्धतीमध्ये महाराष्ट्र हे आर्थीक विकासाच्या बाबतीत आघाडीचे राज्य आहे त्याच बरोबर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही कृषी प्रधान अर्थव्यवस्था आहे महाराष्ट्र हे भारतातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने तिसरे व लोकसंख्येच्या बाबतीत दुसरे मोठे राज्य आहे. 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या 11.52 कोटी आहे व 3.08 लक्ष चौ.कि.मी. भौगोलिक क्षेत्रफळ आहे. महाराष्ट्र राज्याचे 42 टक्के नागरीकरण झालेले आहे. महाराष्टात एकुण 36 जिल्हे आहेत. कोकण,पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर असे सहा महसुली विभाग आहेत. महाराष्ट्राचे स्थुल घरगुती उत्पादन 2165558 कोटी आहे. यामध्ये

औद्योगीक क्षेत्र 31.2 टक्के सेवाक्षेत्र 56.5 टक्के तर कृषी व कृषी सलग्नक्षेत्राचा 12.3 टक्के हिस्सा आहे.

राज्यात एकुण लागवडीखालील क्षेत्र 224.5 लाख हेक्टर आहे. यापैकी 17.7 टक्के क्षेत्राला सिंचनाची व्यवस्था आहे व एकुण वनाखाली क्षेत्राचे प्रमाण 20.1 टक्के आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने खरीप आणि रब्बी हे दोन्ही पिके घेतली जातात. खरीप मध्ये ज्वारी, बाजरी, तांदुळ, तुर, मुग, उडीद, सोयाबीन आणि कापुस हे पिके घेतली जातात. रब्बी हंगामामध्ये गहु, हरभरा, ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. बारमाही पिकामध्ये ऊस, हळद, केळी, हे व्यापारी पिके घेतली जातात.

हिंगोली जिल्ह्याची अर्थव्यवस्था :

हिंगोली जिल्हा हा महाराष्ट्रातील महत्वाचा जिल्हा आहे. हिंगोली जिल्हा हा परभणी जिल्ह्याचे विभाजन होवुन 01 मे 1999 रोजी अस्तित्वात आला आहे प्राचिन काळात विंगुली, लिंगोली असा उल्लेख हिंगोलीचा आहे. हिंगोली ही एक बाजारपेठ असून जिल्ह्यातील औंढा नागनाथ मंदीरासाठी देखील हा जिल्हा प्रसिद्ध आहे. हिंगोली हे नांदेड अकोला महामार्गावरील एक महत्वाचे ठिकाण आहे. तसेच या ठिकाणी ब्रम्हांड व गुरूत्वाकर्षण तरंगाचा अभ्यास करण्यासाठी जगात दोन प्रयोग शाळा आहेत. त्यापैकी नासा या संस्थेने तिसरी प्रयोग शाळा स्थापन करण्यासाठी हिंगोली जिल्ह्याची निवड केली आहे.

हिंगोली जिल्हा हा मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील महत्वाचा जिल्हा आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील ऐतिहासिक जिल्हा म्हणुन ओळखला जातो जिल्ह्यातील मुख्य ठिकाण असलेले हिंगोली शहर हे कयाधु नदीच्या काठावर वसलेले आहे. हिंगोली जिल्हा महाराष्ट्राच्या दख्खन पठारावर वसलेला आहे. हिंगोली जिल्हा 19.05 उत्तर ते 20.05 उत्तर या अक्षांशावर आणि 76.30 पुर्व ते 77.30 पुर्व या रेखांशाच्या दरम्यान पसरलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा

आणि वाशिम पुर्वेस यवतमाळ आणि नांदेड दक्षिणेस नांदेड आणि परभणी तर पश्चिमेस : परभणी आणि जालना जिल्ह्याच्या सिमा आहेत. जिल्ह्याचे क्षेत्रफळ 4827 चौ.कि.मी. असुन ते महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत 1.57 टक्के आहे.

जिल्ह्याचा प्रदेश हा गोदावरी खोऱ्यात येत असला तरी पैनगंगा खेऱ्यातील कयाधु व पुर्णा या उपखोऱ्यात समावेश होतो समुद्रसपाटीपासून उंची सर्व साधारण 500 मीटर आहे. 2011 च्या 15 व्या जनगणने नुसार हिंगोली जिल्ह्याची एकुण लोकसंख्या 1177345 असुन त्यापैकी 606294 पुरूष व 571051 स्त्रीया आहेत. दर हजार पुरूषामागे 942 स्त्रिया आहेत. जिल्ह्यातील हवामान पावसाळ्या व्यतिरीक्त सर्वसाधारणपणे कोरडे असते. हिंगोली जिल्ह्याचे वार्षीक सरासरी प्रजन्यमान 824.40 मीमी असुन जिल्ह्यात नैरत्य मोसमी वाऱ्याखेरीज ऑक्टोबर व नोव्हेंबर महिण्यात बिगर मौसमी पाऊस पडतो. हिंगोली जिल्ह्याचा प्रदेश उष्ण कटीबद्धातील असल्यामुळे उन्हाळा कडक असतो जिल्ह्यातील सरासरी किमान तापमान 12.6 सेल्सिअस ते कमाल तापमान 41.10 सेल्सिअस असतो. संपुर्ण जिल्ह्याचा समावेश बेसॉल्टीक खडकजन्य भुप्रदेशात होतो. या भागात रेगुर मृदा आढळते.

हिंगोली जिल्हा हा कृषी प्रधान जिल्हा म्हणुन ओळखला जातो जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र 469241 हे. असुन त्यापैकी निव्वळ पिकाखालील क्षेत्र 406697 हेक्टर इतके आहे. जिल्ह्यात उडीद, मुग, सोयाबीन, तांदुळ, कापुस इत्यादी महत्वाची खरीप पिके असुन हरभरा, कडई, गहु ही रब्बी पिके आहेत. केळी,ऊस व हळद हे महत्वाची व्यापारी पिके जिल्ह्यात घेतली जातात. जिल्ह्यात 35841 कृषी व बिगर कृषी उद्योग आहेत त्यापैकी 28392 ग्रामीण तर 7449 नागरी भागात कार्यरत आहेत. एकुण 61355 या उद्योगात कामगार कार्यरत आहेत. जिल्ह्यात 49 नोंदणीकृत उद्योग असुन त्यापैकी सुक्ष्म उद्योग, लघु उद्योग, मध्यम उद्योग व मोठे

उद्योग अशी वर्गवारी आहे. जिल्ह्यात हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, व वसमत अशी पाच तालुके आहेत. त्यापैकी सिंचनाच्या बाबतीत वसमत तालुका अग्रेसर आहे. जिल्ह्यात एकुण लागवडीखालील क्षेत्रापैकी 27 टक्के क्षेत्राला सिंचन व्यवस्था उपलब्ध आहे. हिंगोली जिल्ह्यातील सेवा क्षेत्रात दळणवळण, बॅंका, विमा व्यवसाय, व्यापार, वित्त, आरोग्य, शिक्षण, उपहागृह व मनोरंजन आणि पर्यटन इत्यादींचा अल्पविकास झालेला आहे.

संशोधन विषयाची आवश्यकता :-

भारताची पर्यायाने महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखला जाणाऱ्या कृषि मध्ये होणाऱ्या उत्पादन खर्चाचा व कृषि मालाला मिळणाऱ्या किंमती ह्या योग्य आहेत काय ? महाराष्ट्रातील मागास जिल्हा म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या हिंगोली जिल्ह्यातील शेती आणि शेतकरी यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी व त्याच बरोबर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाणाऱ्या हळद उत्पादनाचा खर्च, हळद उत्पादनाला मिळणाऱ्या किंमती यांचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी हे संशोधन आवश्यक आहे. तसेच हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी हे संशोधन महत्वपुर्ण आहे. हिंगोली जिल्ह्याची हळदीचे विक्रमी उत्पादन घेणारा जिल्हा म्हणुन ओळख आहे. येथील हळदीला देशभरातून मागणी असते. त्याअनुषंगाने राज्य शासनाने आधुनिक पध्दतीने ओल्या हळकुंडावर प्रक्रिया करुन शेतकऱ्यांची हळद शिजविणे, वाळविणेसाठीचा खर्च कमी करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात वसमत येथे बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन प्रक्रिया केंद्र मंजूर केले आहे. यासाठी निधी देखील मंजूर करण्यात आला आहे. यामुळे हिंगोलीची हळद सातासमुद्रापार जाणार आहे. परिणामी, हळद पिकालाही महत्व येणार आहे. अनेकांना यातून रोजगार मिळणार असून, जिल्ह्यासाठी हा प्रकल्प महत्वपूर्ण ठरणार

आहे. या बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्रामुळे हिंगोलीची हळद जगाच्या नकाशावर पोहोचणार आहे.

हिंगोली परिसरात वायगाव प्रतिभा सेलम या जातीच्या हळदीची लागवड मोठ्या प्रमाणावर होते. राज्यात मागील वर्षी हळद लागवडीचे एकूण क्षेत्र सुमारे 84 हजार 66 हेक्टर आहे. त्यापैकी एकट्या हिंगोलीत 49 हजार 764 हेक्टर क्षेत्रावर हळद लागवड केली आहे. हे क्षेत्र एकूण क्षेत्राच्या तुलनेत निम्म्याहून अधिक आहे. याशिवाय जवळच्या नांदेड जिल्ह्यात 13 हजार 131 हेक्टर, वाशिम जिल्ह्यात 4 हजार 149 हेक्टर असे हळदीचे क्षेत्र आहे. मराठवाडा आणि विदर्भात हळदीचे क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे उत्तर भारतातील व्यापारी सांगली ऐवजी मराठवाड्यातील हळदीला पसंती देत आहेत. दरम्यान, जिल्ह्यात मंजूर झालेल्या हळद प्रक्रिया उद्योगाने उच्चशिक्षित बेरोजगार युवकांसाठी हा प्रकल्प वरदान ठरणार आहे.

जिल्ह्यात हळदीमध्ये अडचणीची बाब म्हणजे हिंगोलीसह मराठवाड्यातील हळदीत कुरक्युमीनची मात्रा कमी आहे. इथल्या हळदीचा रंग आणि चव उत्तम असल्यामुळे या हळदीला घरगुती वापरासाठी मोठी मागणी आहे. बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून केंद्रामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे पिकांचे आयुष्यमान वाढविण्यासाठी रेडिएशन सेंटर, कूल स्टोअरेजची व्यवस्था होणार आहे. तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी भाभा परमाणू अनुसंधान केंद्राच्या अग्री बायोटेक विभागामार्फत प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहे. हळदीचे संकरीत बियाणे, खत आणि पाण्याचे योग्य नियोजन व हळदीसाठी लागणारे कृषी अवजारे, यांत्रिकिकरण, बॉयलर व पोलिशर साहित्यासाठी शेतकऱ्यांना सबसिडी, कुरकुमीन तपासणी केंद्र, हळद निर्यात केंद्र, व्यवस्थापन, माती-पाणी तपासणी केंद्र आदी सुविधा केंद्राच्या

माध्यमातून मिळणार आहे. एवढेच नाही तर टिश्यू कल्चर प्रयोगशाळा उभारुन त्यावरही काम केले जाणार आहे. एक जिल्हा एक पीक या योजनेत हिंगोलीचा अगोदरच समावेश झाला आहे. तसेच हळद काढणी पश्चात ओले हळकुंड शिजवणे, त्यांना सूर्यप्रकाशात वाळविणे हे कौशल्याचे काम आहे. त्यासाठी कुशल मनुष्यबळाची कमतरता नेहमीच भेडसावते. या समस्येवर मात करण्यासाठी समितीने विविध उपाययोजना सुचविल्या आहेत. हळकुंड तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रती एकर 10 हजार रुपयापर्यंत खर्च येतो. काढणी प्रक्रियेचा खर्च कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कच्ची हळद ते हळद पावडर करण्यासाठी केंद्रीय अन्न तंत्रज्ञान संशोधन संस्था, म्हैसूर यांनी हळद काढणी पश्चात नवीन तंत्रज्ञान तयार केले आहे. तसेच पारंपारिक पध्दतीने शिजविण्याच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात लाकडांचा प्रयोग होत असल्यामुळे प्रदूषण होत असल्याचा कधीकधी आरोप होतो. आधुनिक पध्दतीने ओल्या हळकुंडावर प्रक्रिया करुन शेतकऱ्यांची हळद शिजविणे, वाळविणे यासाठीचा खर्च कमी करण्यासाठी जिल्ह्यात वसमत येथे बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण प्रक्रिया केंद्र मंजूर करण्यात आले आहे. यासाठी निधी देखील मंजूर करण्यात आला आहे. यामुळे हळदीला महत्व येणार आहे. शिवाय हळदीचे उत्पादन क्षेत्र आणखी वाढणार आहे. त्याचा लाभ देखील होणार असल्याने यातून रोजगार निर्मिती होणार आहे. यामुळे बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्र हा प्रकल्प जिल्ह्यासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे.

शासनाने हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र उभारण्यास मान्यता दिली आहे. यास 100 कोटी रुपये निधीही उपलब्ध करुन दिला आहे. याचे काम वेगाने सुरु आहे. आपल्या भागात हळदीचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात आहे. या भागात राष्ट्रीय महामार्ग रस्त्याच्या बाजूला

शासकीय जागा उपलब्ध झाल्यास 1100 कोटी रुपये खर्च करुन हळदीच्या कल्स्टरसाठी 100 एकर जागेवर लॉजिस्टीक पार्क उभारण्यात येणार असल्याचे केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी माहे फेब्रुवारी, 2023 मध्ये हिंगोली दौऱ्यावर आले असताना सांगितले आहे. येथे हळदीपासून विविध उत्पादने निर्माण केल्यास आपली हळद जगाच्या नकाशावर येऊन साता समुद्रापलीकडे जाणार आहे. सध्या जालना येथे एक्सपोर्ट-इम्पोर्ट सुरु होणार आहे. त्यामुळे हिंगोली येथील हळद सातासमुद्रापलीकडे जगात जाईल आणि शेतकरी समृध्द होतील.

दरम्यान, कोरोनानंतर हळदीला जगभरात मोठे महत्व आले आहे. पाश्चिमात्य राज्यात रोग प्रतिकार शक्ती वाढविणारा (इम्युनिटी बुस्टर) घटक म्हणून हळदीच्या गोळ्या विकल्या जात आहेत. स्टार बक्ससारख्या आंतरराष्ट्रीय चैन असलेल्या कॅफेमध्ये ‘गोल्डन टर्मरिक ल्याटे’ या नावाने हळदीचे दूध महागड्या दराने विकले जात आहे. युरोपात अल्झायमर व पार्किन्सन आदी आजारांच्या औषधामध्ये हळदीपासून निर्माण होण्याऱ्या तेलाचा वापर करण्यात येत आहे. हळदीमधील कुरकुमिनचा वापर सौंदर्य प्रसाधनांमध्ये त्वचा उजळ करण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जात आहे. हळद प्रक्रिया करुन हळदीपासून निघणारी साल ही मच्छररोधक व अगरबत्तीमध्ये वापरण्यात येते. यापुढे हळदीच्या सालीलाही मोठी मागणी असणार आहे. तसेच कृत्रिम रंग उद्योगातही हळदीला मोठी मागणी आहे. त्यामुळे भविष्यात हिंगोलीसह संपूर्ण मराठवाड्यात हळदीचे मोठे क्लस्टर तयार करण्याचे आणि या क्लस्टरच्या माध्यमातून हळदीचे बेणे, सिंचन पध्दती यात बदल होणे आवश्यक आहे. राज्य सरकारने हळदीवर संशोधन, मार्केटींग आणि प्रक्रिया उद्योगाला चालना देणे या क्षेत्रात नवनवे संशोधन करण्यासाठी वसमत येथे बाळासाहेब ठाकरे संशोधन केंद्राची स्थापना सन 2022 च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मान्यता देत 100 कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन देण्यात

आला आहे. सन 2022-23 या वर्षात 10 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या निधीतून हळद संशोधन केंद्राच्या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्मितीचे काम सुरु आहे. उर्वरित निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

जगातील हळदीखालील क्षेत्राचा विचार केल्यास 81 टक्के क्षेत्र भारतात आहे. त्यानंतर चीन 7 टक्के, म्यानमार 4 टक्के, नायजेरिया 3 टक्के, बांगलादेश 3 टक्के, तसेच व्हिएतनाम व श्रीलंका प्रत्येकी 1 टक्के याप्रमाणे क्रम येतो.

भारतात हळद हे मसाला पिकांतील प्रमुख नगदी पीक म्हणून ओळखले जाते. भौगोलिकदृष्ट्या हळद लागवडीस भारतात अनुकुल वातावरण असल्यामुळे भारतात सर्वदूर हळदीची लागवड होऊ शकते. भारतात हळद प्रामुख्याने महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू, छत्तीसगड, आंध्रप्रदेश इत्यादी राज्यात घेतली जाते. सन 2019-20 मध्ये देशात हळद पिकाखालील क्षेत्र 2.18 लक्ष हेक्टर होते. त्यापैकी 54 हजार 885 हेक्टर क्षेत्र हे महाराष्ट्रात होते. सन 2021-22 च्या आकडेवारीनुसार राज्यात एकूण 1.02 लक्ष हेक्टर क्षेत्र हळद पिकाखाली आहे. राज्यात हळदीचे क्षेत्र प्रामुख्याने मराठवाड्यात सर्वाधिक आहे. राज्यातील हळद पिकाखालील क्षेत्रापैकी मराठवाड्यात हळद पिकाखाली एकूण क्षेत्र 82 हजार 9 हेक्टर म्हणजे 80 टक्के आहे.

जगात उत्पादित होणाऱ्या एकूण हळदीपैकी 80 टक्के हळद भारतात उत्पादित होते. देशातील एकूण उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा 50 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्रातील हळद उत्पादनाचा विचार करता राज्यातील एकूण उत्पादनाच्या 60 टक्क्याहून जास्त वाटा एकट्या हिंगोली जिल्ह्याचा आहे. सन 2021-22 मध्ये राज्यातील हळद पिकाखालील क्षेत्र 1 लाख 2 हजार 162 हेक्टर होते. यामध्ये हिंगोली जिल्ह्यात 49 हजार 764 हेक्टर, नांदेडमध्ये 21 हजार 414, परभणीत 8 हजार 807 हेक्टर, यवतमाळ 6 हजार 166 हेक्टर, वाशिम 5 हजार 604 हेक्टर,

सातारा 1 हजार 788 हेक्टर, बुलढाण्यात 1 हजार 525 हेक्टर, जालन्यात 1 हजार 77 हेक्टर, जळगावात 984 हेक्टर, चंद्रपूरमध्ये 784 हेक्टर, सांगली 778 हेक्टर, भंडारा 395 हेक्टर, लातूर 352 हेक्टर, नागपूर 351 हेक्टर, गोंदियात 341 हेक्टर, इतर जिल्ह्यात 2 हजार 32 हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली आहे.

हळद उत्पादनात एकट्या हिंगोली जिल्ह्याचा 60 टक्के वाटा आहे. हिंगोली जगात सर्वाधिक हळद पिकविणारा जिल्हा महणून जागतिक नकाशावर झळकत आहे. आजवर सांगलीची हळद बाजारपेठ जगात प्रसिध्द होती. सांगलीसह सातारा, मराठवाडा आणि कर्नाटकच्या सीमा भागातील हळद विक्रीसाठी सांगलीत येत होती. आता हिंगोली, वसमत, वाशिम, नांदेड येथे हळदीचे सौदे होऊ लागले आहेत. बाजारपेठ उपलब्ध झाल्याने आणि सरासरी नऊ हजार ते दहा हजार प्रती क्विंटल दर मिळतो. टिश्यू कल्चरची रोपे, औषधे, कीडनाशके, सेंद्रीय हळद उत्पादन करण्याची शास्त्रशुध्द पध्दतीचा विकास, हळदीची काढणी पश्चात प्रक्रिया, मसाल्यासह विविध ॲलोपॅथिक आणि आयुर्वेदिक औषधांचे आणि सौंदर्य प्रसाधनाच्या उत्पादनाचे कारखाने आणि हळदी विक्रीची जागतिक साखळी निर्माण करण्यासाठी काम सुरु असल्याचे यातील तज्ज्ञ सांगत आहेत. सध्या बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. जिल्ह्यात हळदीचे आतापर्यंत केवळ विक्रमी उत्पादन होत होते. परंतू या संशोधन केंद्रामुळे तंत्रशुध्द पध्दतीने वाढीव उत्पादन कसे घ्यावे याची शेतकऱ्यांना माहिती होणार आहे. तर याच ठिकाणी प्रक्रिया उद्योग उभारले जाणार असून, तरुणांच्या हाताला काम मिळणार आहे. राज्यात सर्वाधिक हळदीचे उत्पादन हे हिंगोली जिल्ह्यात होत असून, येथून अधिकची निर्यात केली जात होती. मात्र, प्रक्रिया उद्योगामुळे व्यवसायाला अधिक चालना मिळणार आहे. मराठवाड्यातील शेतकरी आणि उच्चशिक्षित बेरोजगार युवकांसाठी वरदान ठरणारा हा प्रकल्प लवकरच पूर्ण होईल,

यासाठी राज्य सरकार देखील प्रयत्नशील आहे. त्यामुळे हा प्रकल्प संपूर्ण मराठवाड्याच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Research Objectives) :

1) हिंगोली जिल्ह्यातील कृषी अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे.
2) हिंगोली जिल्ह्यातील हळद उत्पादन क्षेत्राचा अभ्यास करणे.
3) हळद उत्पादनाचा खर्च आणि किंमतीचा अभ्यास करणे.
4) हिंगोली जिल्ह्यातील हळद बाजार पेठांचा अभ्यास करणे.
5) हिंगोली जिल्ह्यातील हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
6) हिंगोली जिल्ह्यातील हळद उत्पादनातील नवीन संधीचा अभ्यास करणे.

गृहितके (Hypothesis) :

संशोधनाचा अभ्यास विषय निश्चित झाल्यानंतर उपलब्ध माहितीच्या आधारे दिशादर्शक म्हणून गृहितकांची निर्मिती करावी लागते. गृहितकांमुळे संशोधनाची दिशा निर्धारित होते या अनुषंगाने संशोधनात गृहित धरलेले गृहितके पुढील प्रमाणे.

1. हिंगोली जिल्ह्यातील कृषी क्षेत्र मागास आहे.
2. हिंगोली जिल्ह्यातील हळद अदानाच्या (Input) किंमतीतील वाढ ही हळद उत्पादनाच्या (Output) किंमतीतील वाढीपेक्षा जास्त आहे.
3. हळद उत्पादनाचा खर्च वाढता आहे.
4. हिंगोली जिल्ह्यातील हळद उत्पादन खर्चाच्या तुलनेत लाभ-प्रमाण घटते आहे.
5. हिंगोली जिल्ह्यातील हळद उत्पादक शेतऱ्यांची आर्थिक स्थिती खालवत आहे.

संशोधन पध्दती (Research Method) :

संशोधन पध्दतीच्या सजग वापरामुळे संशोधनाचे अनुमान, निष्कर्ष तंतोतंत येण्यास मदत होते. संशोधन पध्दती ही यशस्वी संशोधन प्रकल्पाची पायाभरणी ठरु शकते. तंतोतंत निष्कर्षाच्या जवळपास पोहचण्यासाठी प्रभावी माध्यम म्हणून संशोधन पध्दतीकडे पाहिले जाते. सदर संशोधन प्राथमिक व दुय्यम माहितीवर आधारित आहे.

१) प्राथमिक माहिती (Primary Data) :

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोत मुलाखती, प्रश्नावली व नमुना सुची इत्यादींचा आधार घेण्यात येईल.

२) दुय्यम माहिती (Secondary Data) :

व्दितीय स्त्रोतात लिखित ग्रंथाचा, मासिक, साप्ताहिक, विशेषांक आणि सर्वेक्षण अहवाल या दस्ताऐवजांचा आधार घेण्यात येईल.

नमुना निवड पद्धती (Sample size and procedure) :

संशोधन करण्यासाठी प्रातिनिधी नमुना निवड म्हणुन हिंगोली जिल्ह्यातील पाच तालुक्यातील हळद उत्पादन खर्च व हळद उत्पन्न काढण्यासाठी प्रती तालुका वीस शेतकऱ्यांच्या माहितीचा आढावा घेतला जाईल. जिल्ह्यात घेतल्या जाणाऱ्या हळद व्यापारी पिकांचा आढावा घेतला जाईल. कृषी खर्च लाभ प्रमाणाचा अभ्यास करण्यासाठी प्रती हेक्टरी उत्पादन खर्च व किंमतीचा अभ्यास केला जाईल तसेच हिंगोली जिल्ह्यातील कृषी क्षेत्राच्या मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी जिल्ह्यातील कृषी क्षेत्राचा अभ्यास केला जाईल व हळद उत्पादनाचा अभ्यास करण्यासाठी संख्यात्मक गुणात्मक बाबींचा सखोल अभ्यास करुन विकास व विस्तारांच्या संधी या विषयी दिशानिर्देश करुन संशोधन पुर्ण केले जाईल.

सांख्यिकीय साधने (Statistical Tools) :

विषयाच्या अनुषंगाने संकलीत केलेल्या प्रस्तुत सांख्यिकीय तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी विविध सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यासाठी पुढील साधनांचा उपयोग करण्यात येईल.

1) माध्य (Mean)

2) प्रमाण विचलन (Standard Deviation)

3) विचरण गुणांक (Coefficient of Variation)

4) सहसंबंध गुणांक (Coefficient of Correlation)

5) वार्षिक वृद्धीदर (Annual Growth rate)

6) संयुक्त वार्षिक वृद्धीदर (Compound Annual growth rate)

संशोधन विषयाचे महत्त्व : (Significance of Study Subject)

1) हिंगोली जिल्ह्यातीन हळद उत्पादन खर्चावर संशोधन होणे आवश्यक आहे.

2) हिंगोली जिल्ह्यातील हळद उत्पादन खर्च आणि किंमती यातील संबंध योग्य आहे काय ? या दृष्टीकोणातून संशोधनाचे महत्त्व आहे.

3) हळद उत्पादन खर्च काढण्याच्या दृष्टीकोणातून संशोधनाचे महत्त्व आहे.

4) कृषी उत्पादन खर्च आणि कृषी मध्ये होणारा प्रत्यक्ष खर्च यावर संशोधन होणे आवश्यक आहे.

5) बदलत्या काळाबरोबर शेती करणे परवडणारे आहे का ? यावर संशोधन करणे आवश्यक आहे.

6) कृषीतील किंमतीच्या चढउताराच्या दृष्टीकोणातून या संशोधनाचे महत्त्व आहे.

7) कृषी अदान किंमतीचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

8) कृषी मालाच्या किंमती कशा निर्धारीत कराव्यात या दृष्टीकोणातून संशोधनाचे महत्त्व आहे.

9) शेती ही किफायतशीर करणे श्यक्य आहे. त्यासाठी जनजागृती, लोकसहभाग, विवेकशिल नेतृत्व व जाणिवपुर्वक धोरणात्मक उपाय सार्वत्रिक व प्रभावीपणे राबविण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

10) भारतातील व महाराष्ट्रातील कृषी उत्पादन किंमत धोरणाचे मुल्यमापन करण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

11) हिंगोली जिल्ह्यातील कृषी क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

12) हिंगोली जिल्हयातील हळद उत्पादन क्षेत्राचा विकास व विस्तार आणि संधी यांचा अभ्यास करणे.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा (Scope and limitations of the study) :

संशोधनाची व्याप्ती हि हिंगोली जिल्ह्यातील पाच तालुक्यातील हळद उत्पादन खर्च काढण्यासाठी जिल्ह्यातील पाच तालुक्यातील प्रती 20 शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे एकुण 100 शेतकऱ्यांचा अभ्यास करण्यात येईल व हळद उत्पादन किंमतीचा अभ्यास करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार पेठेतील 2014-15 ते 2023-24 या कालावधीतील किंमतीचा अभ्यास केला जाईल. ही संशोधनाची मर्यादा आहे.

संबंधित संशोधन साहित्याचा अभ्यास (Review of Literature) :

संबंधित संशोधन विषयावर कृषि खर्च व किंमत आयोग हे संशोधन करित असते. तसेच या आयोगाच्या २००३ - २००४ च्या अहवालानुसार कृषि उत्पादन खर्च व किमतीवर संशोधन झाले आहे. तसेच एस. महेंद्र देव आणि एन. चंद्रशेखर राव यांनी कृषि किंमत धोरण, लाभ आणि अन्न सुरक्षितता संबंधी संशोधन केले

आहे. तसेच कृषि खर्च व किंमत आयोगाने ऊसाचे किंमत धोरण २०१०-२०११ या विषयी अहवाल प्रसिध्द केला आहे. एस. नारायणन यांच्या भारतातील जैविक कृषि संबंधित समस्या आणि मर्यादा या ग्रंथात कृषि खर्च आणि लाभ धोरणाचा अभ्यास केला आहे.

भारतीय नियोजन आयोगा मार्फत भारतीय कृषितील खर्च आणि किंमतीवर संशोधन अहवाल प्रसिध्द केले आहेत. अमेरिकेतील वॉशिंग्टन येथे आयोजित कृषि बाजार मुल्य व खर्च या परिषदेत पी. कुमार, पी.सिंहोज, एस.एस.राजू., ए. कुमार, कार्ल रिच आणि सीवा मसंगी यांनी भारतातील मुख्य पिकातील मागणी घटक, उत्पादन पुरवठा व पुरवठा लवचिकता या विषयी संभाव्यता हा शोध निबंध प्रसिध्द केला आहे. त्यामध्ये कृषि आदान किंमती व अन्नधान्य मालाची उत्पादन लवचिकता, खर्च आणि किंमतीचा अभ्यास केला आहे.

सुरभी मित्तल यांनी अमेरिका - भारतातील कृषि ज्ञानातील संधी या परिसंवादात शोध निबंध सादर केला आहे. त्यात त्यांनी भारतातील उत्पादन खर्च व उत्पादन किंमतीवर संशोधन केले. विरांडे ए.के. व शाहु सिमांचला यांनी महाराष्ट्रातील अप्पर वर्धा सिंचन प्रकल्पाचा शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेवरील परिणाम हया शोध निबंधात कृषि खर्च व किंमतीचा अभ्यास केला आहे. वाघमारे एम. एन., शेंडगे पी.एन., यादव डी.बी. यांनी महाराष्ट्रातील ज्वारीच्या आदान प्रदानाच्या किंमती आणि उत्पन्न विषयी शोध निबंधात ज्वारीचा खर्च आणि किंमतीचा अभ्यास करुन ज्वारी पासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अभ्यास केला आहे. खाटकर आर.के., करवसरा जे.सी., पुन आर. एस. दहिया अरुण यांनी हरियाणातील पिकांच्या आदान प्रदान किंमतीतील कल आणि त्याचा लाभ तत्वावरील परिणाम या विषयी अभ्यास केला आहे.

प्रकरण योजना : (Chapter Scheme)

प्रस्तुस संशोधन विषयाचे विश्लेषण एकुण सहा प्रकरणामध्ये करण्यात आलेले आहे.

1) प्रकरण पहिले - प्रस्ताव व संशोधन पद्धती :

या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्ताव, संशोधन विषयाची आवश्यकता, संशोधन उद्दीष्टे, गृहितके, संशोधन पद्धती, संशोधनाचे महत्व आणि संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यात येईल.

2) प्रकरणे दुसरे - हिंगोली जिल्ह्याची अर्थव्यवस्था :

प्रस्तुत प्रकरणात हिंगोली जिल्ह्याची पार्श्वभूमी व इतिहास हिंगोली जिल्ह्याची भौगोलिक व आर्थिक वैशिष्ट्ये, लोकसंख्या, कृषी क्षेत्र, कृषी करण्याच्या पद्धती थोडक्यात हिंगोली जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक घटकांचा समग्र आढावा घेण्यात येईल.

3) प्रकरण तिसरे - संशोधन साहित्याचा आढावा :

प्रस्तुत प्रकरणामध्ये सदरील संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

4) प्रकरण चौथे – हळद उत्पादन खर्च व किंमतीचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात हळद उत्पादन अदान (Input) आणि हळद उत्पादन (Output) किंमतीचा आढावा घेण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने कृषी अदानाच्या अभ्यास, कृषी अदानाच्या किंमती खर्च काढण्याच्या विविध पद्धती, कृषी पिकांचा आढावा व किंमती इत्यादी घटकांचा सर्व समावेश अभ्यास करुन हळद उत्पादनांचा खर्च व किंमतीतील वाढीची प्रवृत्ती खर्च व किंमती यांची तुलना करुन हळद पिकाचा आढावा घेण्यात येईल.

5) प्रकरण पाचवे – हिंगोली जिल्ह्यातील हळद उत्पादनाचा खर्च व लाभ प्रमाणाचा अभ्यास :

या प्रकरणात हिंगोली जिल्ह्यातील 100 शेतकऱ्यांच्या मुलाखत अनुसूचिद्वारे संग्रहित केलेल्या माहितीच्या आधारे 2023-24 या वर्षातील हळद उत्पादन खर्च व किंमती यांचा तुलनात्मक अभ्यास करुन हिंगोली जिल्ह्यातील हळद खर्च व लाभ प्रमाणाचा अभ्यास केला जाईल शेतीमध्ये प्रत्यक्ष वापरात येणारी अदान निविष्ठांच्या (Input) किंमती प्रत्यक्ष झालेला खर्च काढण्याची पद्धती कृषी उत्पादनाला मिळणाऱ्या किंमती आणि कृषी खर्च लाभ प्रमाणाचा शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवरील परिणाम इत्यादींचा अभ्यास याप्रकरणात केला जाईल.

6) प्रकरण सहावे - निष्कर्ष, सारांश, शिफारशी :

संदर्भ सूची :

1. गौरव दत्त आणि अश्विनी महाजन (2013) ; भारतीय अर्थव्यवस्था, एस.चंद आणि कंपनी लि. नवी दिल्ली.
2. डॉ.बी.एल. माथुर (2013) ; कृषी अर्थशास्त्र, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली.
3. Swaminathan M.S. (2004) ; First reports of National commission on farmers Govt. of India, New Delhi.
4. B.D. Engle, V.B. Bhise (2009); Acreage Response of oilseed crops in a back word region, serial publications, New Delhi.
5. H.Parmeshwar Hegde (2011); Agriculture and cash crop discovery public house Pvt. Ltd. New Delhi.

6. कुलकर्णी व ढमढेरे (2007) ; अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती, डायमंड प्रकाशन पुणे.
7. प्रदिप आगलावे (2008) ; सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
8. Damodhar N. Gujrati (2003); Basic Econometrics MCGraw Hill New York U.S.
9. Bhise V.B. (1992) ; A study of regulated Markets in Agriculture Marketing Prospective and Issues, Arihant Publishers, Jaipur.
10. Indrasen Reddy (1995) ; Price Behaviour of Agricultural Commodities, Indian Journal of Marketing.
11. Acharya S.S. and Agrawal H.L. (1994) ; Agricultural Price, Oxfor and IBH Publishing Co.Pvt.New Delhi.
12. Surbhi Mittal (2007) ; Sustainable Development and Agriculture ICRIER and Ministry of External affairs Govt. Of India, New Delhi.
13. Mahendra Dev and Chandrashekar Rao (2007); Agricultural price Policy, from profitablitity and food security ; An analysis of rice and wheat, Ministry of Agriculture Govt. Of India, New Delhi.
14. मनोहरचंद पांडे (2011) ; कृषी विपणन, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस प्रा.लि.नवी दिल्ली.

15. Ashok Vishnudas and B. Lukka (2013) ; Pricing costs returns and productivity in Indian Crop Sector during 2005, Ministry of Agriculure Govt. Of India, New Delhi.

16. Ashok Gulati, Surbhi Jain, Anwaral Hoda (2013) ; farm trade tapping the hidden potential discussion paper of CACP. Ministry of Agriculure Govt. Of India, New Delhi.

17. Bioginical Agricultural Problems and Limitation in India S.Narayan Economics research analysis Depart Govt. Of India, Cost benefit principal.

18. Maharashtra Economic Servey-2010-11

19. हिंगोली जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन -2011-12

20. हिंगोली जिल्ह्याचे सामाजिक व आर्थिक समालोचन -2021-22

21. महासंवाद, महिती व जनसंपर्क महासंचालकनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.

संशोधक
विठ्ठल दत्तराव कदम
सामाजिक शास्त्रे विद्यासंकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक
डॉ.डी.के. मगर
पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागप्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, जि. नांदेड